पश्चिमवाहिनी नदी वळण योजना व प्रलंबित लघु सिंचन, प्रकल्प, को.प. बंधारे पाझर तलाव काँक्रिट बंधारे इत्यादि मार्गी लावण्यासाठी समन्वय समिती स्थापन करणे.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/(८७/२०१८)/जसंअ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २६ जुलै, २०१९

प्रस्तावना :

पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातून उपलब्ध असलेले अतिरीक्त पाणी तुटीच्या तापी व गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी नदीजोड/वळण योजना प्रस्तावित आहेत. सदरील नदीजोड/वळण योजनांतर्गत उभारल्या जाणाऱ्या लहान, मोठ्या धरणामध्ये स्थानिक लोकांसाठी राखून ठेवलेल्या १५ टक्के पाण्याच्या योजना, स्थानिकांसाठी ६०० द.ल.घ.फू क्षमतेपर्यंतचे प्रस्तावित ल.पा. योजना, अपूर्ण असलेले को.प. बंधारे व पाझर तलाव, काँक्रिट बंधारे इ. पूर्ण करणे, सदर प्रकल्पासाठी खाजगी व वनजमीन संपादन करणे, निधी उपलब्धतता इत्यादी बाबींचे प्रत्यक्षपणे अंमलबजावणी करणेसाठी तसेच त्याअनुषंगाने शासनाचे संबंधित विभागांमध्ये समन्वये साधुन कामकाजता सुसुत्रता व गती येणेसाठी समन्वय समितीची स्थापना करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:

पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातून उपलब्ध असलेले अतिरिक्त पाणी तुटीच्या तापी व गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी प्रस्तावित नदीजोड/वळण योजनांतर्गत स्थानिक लोकांसाठी राखून ठेवलेल्या १५ टक्के पाण्याच्या योजना, स्थानिकांसाठी ६०० द.ल.घ.फू. क्षमतेपर्यंतच्या प्रलंबित ल.पा. योजना, अपूर्ण को.प. बंधारे, पाझर तलाव व काँक्रिट बंधारे पूर्ण करणे, सदरील प्रकल्पासाठी खाजगी व वनजमीन संपादन करणे, निधी उपलब्धता इत्यादींचे प्रभावीपणे व गतीने अंमलबजावणी करणेसाठी शासनाचे संबंधित विभागांतर्गत समन्वय व कामकाजात सुसुत्रता येणेसाठी पुढीलप्रमाणे समन्वय समिती स्थापन करणेत येत आहे.

अ) समन्वय समितीची रचना:

अ.क्र.	नाव	पदनाम
१	मुख्य सचिव	अध्यक्ष
२	अप्पर मुख्य सचिव महसूल व वनविभाग (मदत व पुनर्वसन)	सदस्य
३	अप्पर मुख्य सचिव ,महसूल व वनविभाग (महसूल)	सदस्य
४	प्रधान सचिव, जलसंपदा विभाग	सदस्य
५	प्रधान सचिव, महसुल व वनविभाग (वने)	सदस्य
६	प्रधान सचिव, कृषी विभाग	सदस्य
७	प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग	सदस्य
८	प्रधान सचिव, जलसंधारण विभाग	सदस्य सचिव

ब) समन्वय समितीची कार्यकक्षा

१. प्रस्तावित नदीजोड/वळण योजनांपर्यंत स्थानिक लोकांसाठी राखुन ठेवलेल्या १५ टक्के पाण्याच्या योजना, प्रलंबित ६०० द.ल.घ.फू. क्षमतेपर्यंतच्या ल.पा. योजना, अपूर्ण असलेले को.प. बंधारे, पाझर तलाव व कॉंक्रिट बंधारे इ. पूर्ण करणे, प्रकल्पासाठी खाजगी व वनजमीन संपादन करणे, निधी उपलब्धता इ. बाबत संबंधित विभागांमध्ये समन्वय व सनियंत्रण करणे.

२. विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे

क) बैठकीची वारंवारिता :- व्दिमासिक

ड) समन्वय समितीचा कालावधी:- ५ वर्ष

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०७३११०५४३०५१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2019.07.31 11:05:07 +05'30'

(र.रा.शुक्ला)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेते विधानसभा व विधानपरिषद
७. मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, विधानसभा व विधानपरिषद
८. श्री. जे.पी. गावीत, मा. विधानसभा सदस्य, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०. अप्पर मुख्य सचिव महसूल व वनविभाग (मदत व पुनर्वसन)
११. अप्पर मुख्य सचिव , महसूल व वनविभाग (महसूल), मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, महसुल व वनविभाग (वने), मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१८. सचिव (प्रकल्प व समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. जसंअ कार्यासन संग्रहार्थ